# महाराष्ट्र पशु व मत्स्य विद्यान विद्यापीठ

## विस्तार शिक्षण संचालनालय

## माफसू यशोगाथा





**माफसू यशोगाथा**



**यशोगात समर्पक शीर्षक : दुधव्यावसाईकाची कोटीची भरारी**

डुग्ध प्रक्रिया उद्योजक : सुधाकर महादेव ठाकरे
मु.पो. —बाभूळगावजि. यवतमाळ पिन कोड . ४४५००१
मो. न. : ९८९०९७६५९२
शिक्षण: १२ वी पास
जन्मदिनांक : २९/१०/१९८४
वय : ४२ वषे
आई वडिलांचा व्यवसाय : चहाची कॅटींग व दुग्ध पशुपालन

नोकरीसाठी प्रयत्न केले पण यशस्वी झालो नाही. काही दिवस मुलांना कराटेचे प्रशिक्षण दिले व स्वता:च्याकॅटिंगमध्ये काम करत होतो. घरी पशुपालन असल्यामुळे
जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय करण्याची इच्छा होती. मला या व्यवसायासाठी आवश्यक प्रशिक्षण दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय वरूड, पुसद येथून प्राप्त झाले. या महाविद्यालयात मी सन.२००९ मध्ये पी.एम. पॅकेजअंर्तगत दुग्ध प्रदार्थ निर्मिती व विक्री या बाबतचे ७ दिवसांचे तांत्रिक प्रशिक्षण घेतले.

माझा व्यवसाय एसकुमार डेअरी या नावाने बाभूळगाव येथे सन.२०१०पासून सुरू केला. सदर व्यवसायाठी शेतजमीन घरचीच होती. व सुरूवातीला घरीच २० म्हशी ठेवून दुध विक्री करत होतो. त्यासाठी २ लाखांची गुंतवणूक केली. लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून हळूहळू व्यवसाय वाढविण्यसाठी एसबीआय बॅकेच्या बाभूळगाव शाखेतून रू १०लाखाची कर्ज घेतले. या व्यवसायासाठी मी स्वत: भाउ व आई—वडील मिळून काम करतो. मी प्रदार्थ विक्रिसाठी ५ ते ६ आउटलेट स्थापन केले. बाभुळगाव व आसपासच्या भागातून

| | | |
|---|---|---|
| जवळपास ३ हजार लिटर दूध संकलित करून खवा, बासंदी, श्रीखंड, आम्रखंड पनीर, दही, ताक व लस्सी ई. पदार्थाची विक्री स्वत:च्या दुकानातून होते. व घरातील इतर मंडळी दुध संकलन व पदार्थ निर्मिती करतात. माझया व्यवसायात सध्यास्थितीत ५ गुंठे जमिन असून जवळपास त्यावर ३ हजार लिटर प्रति तास चा अद्यावत मिल्कप्रोसेसिंगप्लांन्ट उभा केला. माझयाकडे इतर कामासाठी ३३ कामगार आहे.<br>माझया व्यवसायासाठी लागणाऱ्या यंत्र सामग्री मध्ये माझया कडे खवा मशीन, क्रिम सेपरेटर, फ्रीज, इंक्युबेटर, पॅकिंगमशीन व डीप फ्रीज आहेत. माझे सध्याचे वार्षिक उलाढाल खर्च वजा जाता १० ते १२ कोटी रूपये आहे. एक प्रामाणिक तरूण व होतकरू व्यावसायिक म्हणुन श्री. सुधाकर म. ठाकरे यांचा महाराष्ट्र सरकारतर्फे गौरव करण्यात आला आहे. भविष्यात ५० लाख खर्च करून आईसक्रिम प्लांन्ट टाकण्याचे उदिष्ट आहे. सध्या त्यांच्याकडे ४२ दुधाळजनांवरेआहेत. | | |
| **मार्गदर्शक १** | अ.भा. वाकडे<br>दु.शा.व्यवस्थापक<br>(द.त.म वरूड)<br>मो.नं.९७६५६२७९७५ | दुग्ध प्रक्रियाउद्योजक : सुधाकरमहादेवठाकरे (एसकुमार डेअरी)<br>मु.पो. —बाभूळगावजि. यवतमाळपिन कोड.४४५००१<br>दुग्ध प्रक्रियाउद्योजक : सुधाकरमहादेवठाकरे |
| नाव, पदनाम, महाविद्यालयाचे नाव, संपर्क क्र. | | |
| **मार्गदर्शक २** | | |
| नाव, पदनाम, महाविद्यालयाचे नाव, संपर्क क्र. | एस.एस.शिंदे<br>सहायकव्यवस्थापक<br>दु.त.म वरूड,पुसद | |


दूध पाश्चरायझेशन व शीतकरण करण्याची यंत्रणा.


दुधावर प्रक्रिया करून मूल्यवर्धित उत्पादने तयार केली जातात.

(छायाचित्रे : विनोद इंगोले)

**अर्थकथा**

# शून्यातून सुरू केलेल्या दुग्ध व्यवसायाची कोटींची भरारी!

विनोद इंगोले

**एकेकाळी बस पाससाठी पैसे नसल्याने शिक्षण सोडावे लागलेल्या सुधाकर ठाकरे यांनी उधारीच्या ५०० रुपयांमध्ये चहा टपरी सुरू केली. त्यातून येणाऱ्या पैशातून एकेक म्हैस घेत दुग्ध व्यवसायाची उभारणी केली. आज सचोटी, सातत्य आणि मेहनतीच्या बळावर या दूध संकलन आणि प्रक्रिया पदार्थ निर्मिती या व्यवसायातून कोट्यवधींची उलाढाल करत आहेत. हा थक्क करणारा प्रवास आहे देवगाव (ता. बाभूळगाव, यवतमाळ) येथील सुधाकर महादेवराव ठाकरे यांचा.**

मूळ देवगाव येथील सुधाकर यांचे प्राथमिक शिक्षण बाभूळगाव येथे, तर १२ वी पर्यंतचे शिक्षण यवतमाळमध्ये झाले. बी.ए. साठी अॅडमिशन घेतली असली, तरी महाविद्यालयात ये-जा करण्यासाठी एसटी बसच्या पासकरिता २५६ रुपयेदेखील त्यांच्याकडे नव्हते. परिणामी, शिक्षण सोडून त्यांनी काही दुकानांमध्ये कामही केले. दरम्यान, बहिणीचे लग्न झाल्याने कुटुंबावरील कर्जही वाढले होते. शेतमजूर असलेल्या वडिलांना पाच मुलांसह ९ जणांचे कुटुंब चालवताना ओढाताण होत होती. आपणच काहीतरी केले पाहिजे, या उद्देशाने सुधाकर यांची धडपड सुरू झाली.

## उसनवारीतून उभारला व्यवसाय

चहाचे कॅन्टीन सुरू करण्यासाठी २००१ मध्ये सुधाकर यांनी आपले मित्र सुधीर रोकडे यांच्याकडून ५०० रुपये उसने घेतले. तहसील मार्गावर 'एस. कुमार टी सेंटर' सुरू केले. हळूहळू व्यवसाय वाढत गेला. पुढे वाढलेल्या व्यवसायात चहा बनविण्यासाठी सुमारे १५० लिटर दूध लागू लागले. नफाही चांगला राहत असल्याने २००५ मध्ये पहिल्यांदा एक म्हैस खरेदी केली. टप्प्याटप्प्याने एकेक म्हैस वाढवत त्यांची संख्या १५० वर पोहोचली.

## दुग्ध व्यवसायात घेतली भरारी

गेल्या वर्षीपर्यंत गोठ्यात २५ गावरान म्हशी, ६५ मुऱ्हा म्हशी व उर्वरित दुधाळ गाई अशी १५० जनावरे होती. ४०० ते ४५० लिटर दूध संकलन होत होते. मात्र वडील महादेवराव यांना दुर्धर आजाराने ग्रासले. त्यामुळे दुग्ध व्यवसायाकडे फारसे लक्ष देणे शक्य होईना. कामगारांच्या उपलब्धतेची अडचण होती. अशा स्थितीमध्ये आपल्याकडील म्हशी त्यांच्या नियमित दुग्धोत्पादकांना देत त्याचा परतावा दुधातून करण्यास सांगत जनावरांचे वितरण केले. आज त्यांच्याकडे केवळ ४२ दुधाळ जनावरे आहेत.

पान १४ वर »


उजवीकडून मुलगी समृद्धी, पत्नी प्रगती, सुधाकर ठाकरे, मुलगा अभिराज व मुलगी चैतन्या.

### ...असे आहे अर्थकारण

दूध विक्रीसोबतच अडीच ते तीन हजार लिटर दुधापासून पनीर, खवा, दही, ताक, लोणी, पेढा, बासुंदी, श्रीखंड या सारखे प्रक्रियाजन्य पदार्थांच्या उत्पादनावरही त्यांचा भर राहिला आहे. यवतमाळ शहरातील अन्य ७५ ते ८० डेअरींना केवळ दूध, दही, लोणी यांचा मागणीनुसार पुरवठा होतो. अन्य तालुक्यामध्ये ७० ते ७५ डेअरी दुग्ध विक्री केली जाते. अन्य दुग्धजन्य पदार्थांची विक्री स्वतःच्या आउटलेटद्वारे केली जात असल्याचे सुधाकर सांगतात.

| पदार्थ | प्रति दिन सरासरी विक्री | दर (रुपये प्रति किलो) |
|---|---|---|
| पनीर | २५० किलो | ३८० |
| तूप | १२५ किलो | ७०० |
| गीर गाय तूप | २५ किलो | ८०० |
| श्रीखंड | ४२ किलो | २४० |
| खवा | ३५ ते ४० किलो | ३८० |
| पेढा | १०० किलो | ३६० ते ४४० |
| मिठाई | ७२ किलो | ३६० ते १००० |
| बासुंदी | ३३ किलो | २६० |

### हायटेक यंत्रणा उभारली

सुधाकर यांच्याकडे दुग्ध व्यवसायाकरिता आवश्यक सर्व प्रकारच्या यंत्रणा उदा. पाश्चराझेशन, स्टीम ऑपरेटेड खवा मशिन इ. आहेत. दोन कोल्ड स्टोअरेज देखील त्यांनी व्यवसायस्थळी उभारले आहेत. इनक्युबेशन रुम, दही लावण्यासाठी हिटिंग क्वॉइलचा वापर होतो, असे त्यांनी सांगीतले. याकरिता २५ लाख रुपयांचे कर्ज घेण्यात आले. आइस्क्रीम उत्पादन घेण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचे युनिट उभारण्यासाठी सुमारे ५० लाख रुपये खर्च प्रस्तावित आहेत. त्यांच्याच माध्यमातून आइस्क्रीमचे विक्री केली जाणार आहे. कधीकाळी शेतमजूर असलेले हे कुटुंबीय आज १२ एकर शेतीचे मालक आहेत.

### कोट्यवधीच्या उलाढालीचा गाठला पल्ला

सुधाकर यांनी शून्यातून उभारलेल्या या व्यवसायाची वार्षिक उलाढाल १० ते १२ कोटी रुपयांपर्यंत होत आहे. कधीकाळी शेतमजूर असलेले हे कुटुंबीय आज १२ एकर शेतीचे मालक आहेत. दुसऱ्याच्या दुकानात नोकरी मागणाऱ्या सुधाकर यांच्याकडे आज प्रयोगशाळा तज्ज्ञांसह तब्बल ३३ कामगार आहेत.

### ...असे आहे कुटुंब

ठाकरे कुटुंबात सुधाकर यांची आई कलावती, वडील महादेवराव, पत्नी प्रगती आणि तीन मुले यांचा समावेश आहे. मुली समृद्धी आणि चैतन्या या अनुक्रमे दहावी आणि पाचवीत आहेत, तर मुलगा अभिराज हा तिसऱ्या वर्गात आहे. एकेकाळी पाससाठी पैसे नसल्याने शिक्षण सोडावे लागले असले तरी आपली मुले उच्चशिक्षित व्हावीत, यासाठी सुधाकर यांची धडपड आहे.